पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२७८/२०१७
दिनांक : २४/११/२०१७

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **२८/११/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२८/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १५**

दिनांक : **२८/११/२०१७** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२८/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

दिनांक **१५/११/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १४ )** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक २८/११/२०१७ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगररसदस्य व नागरिंकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक २८/११/२०१७ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.३) पुणे मुंबई महामार्गावरील पिंपरी येथील फिनोलेक्स चौक येथे मे.किमया असोशिएटस् हे स्वखर्चाने साधारण २७ फुट उंच व २.५ फुट रुंदीचा अशोकस्तंभ उभारणार आहेत. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. सदर अशोकस्तंभ उभारणेस कला

संचलनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी व पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर यांनी नाहरकत पत्र दिलेले आहे. तथापि सदरचा अशोकस्तंभ उभारणेच्या कामाच्या चबुत-यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**( दिनांक २८/११/२०१७ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.४) रमाबाईनगर कमान ते ११ नं. बिल्डिंग मागे शौचालयापर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व ठिकठिकाणी काँक्रीटीकरण करणेचे र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या कामाचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) पत्राशेड निराधारनगर झोपडपट्टीकडे जाणारा रस्त्याचे हॉट मिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे र.रु.२५,००,०००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या कामाचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड लिंकरोड येथील मैला शुध्दीकरण केंद्राच्या आवारात पुरुषांसाठी शौचालय बांधणेचे र.रु.२५,००,०००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या कामाचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) रमाबाईनगर झोपडपट्टीमध्ये बिल्डिंग नं.११ मागे जुने शौचालय पाडून नविन दुमजली शौचालय बांधेणेचे र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त) या कामाचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) सिध्दार्थनगर झोपडपट्टीमध्ये नाल्याची उंची वाढविणे व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणेचे र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) या कामाचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२७८/२०१७
दिनांक : २४/११/२०१७ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.